# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. शाकेश इनामदार
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८२२ ७० ७० ६१


संदर्भ: रासेयो/२५८/१२

दि. ३ सप्टेंबर २०१२

प्रति
मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी
रासेयो संलग्नित महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**विषय : '५ सप्टेंबर' शिक्षक दिननिमित्त 'आरोग्य जागर सप्ताह' साजरा करणेबाबत...**

महोदय,

आजच्या महाविद्यालयीन युवकांची खालावत चाललेली शारीरिक प्रकृती पाहता शैक्षणिक व मानसिक गरजेप्रमाणेच विद्यार्थी शारिरीक दृष्टया सक्षम असणे अतिशय गरजेचे आहे. भारत हा विकसनशील देश असून आजची युवा पिढी भारताच्या उज्वल भविष्याचा पाया आहे. या दृष्टीकोनातून पाहता आजचा युवक शैक्षणिक, मानसिक, शारिरीकदृष्टया सक्षम असणे अत्यंत आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर '५ सप्टेंबर शिक्षक दिन'निमित्त रा.से.यो च्या माध्यमातून महाविद्यालयांमध्ये दि. ५ ते ११ सप्टेंबर २०१२ दरम्यान **'आरोग्य जागर सप्ताह'** साजरा करण्यात येत आहे.

या 'आरोग्य जागर सप्ताह' सप्ताहामध्ये महाविद्यालयाने जास्तीत–जास्त स्वयंसेवकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करून त्यामध्ये रक्तदान शिबिराबरोबरच रक्तातील हिमोग्लोबीन तपासणी, रक्तगट तपासणी, शारिरीक तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात यावे. **त्याचप्रमाणे आपल्या तालुक्यातील सरकारी रुग्णालये, थॅलेसॅमिया संदर्भात गरजू रुग्णांना मोफत रक्तदान करणाऱ्या रक्तपेढया व शासकीय रुग्णालये यांना रक्तदान शिबिरांमधून जमा केलेले रक्त देण्यास प्राधान्य दयावे ही विनंती. तसेच विद्यार्थ्यांच्या शारिरीक समस्यांचे निदान होईल यादृष्टीने महाविद्यालयांच्या वतीने शासकीय रूग्णालयांमार्फत विद्यार्थ्यांची प्राथमिक शारिरीक चाचणी करून घेण्यात यावी. व त्यावरील उपायांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात यावी व संबधित शिबिराचा अहवाल रासेयो कार्यालयात जमा करण्यात यावा ही विनंती.**

कळावे,

आपली विश्वासू,

कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : महाविद्यालयांकरीता 'रक्तदान महाअभियान' पोस्टर जोडले आहे.

# रक्तदान महाअभियान

पुणे विद्यापीठ

राष्ट्रीय सेवा योजना





रक्तदान करा....

जीवनदान करा....

चला रक्तदान करूया....

जबाबदारी पार पाडूया....









## आरोग्य सप्ताह व रक्तदाना विषयी जनजागृती

दि. ५ ते ११ सप्टेंबर २०१२ (विविध उपक्रम)

GIVE BLOOD GIVE LIFE

- रक्तदान शिबीर
- रक्तगट चाचणी
- हिमोग्लोबीन तपासणी
- रक्तदाब तपासणी
- साथीचे आजार व निदान
- रोजचा व्यायाम व आहार
- मुलींच्या आरोग्या विषयी शिबीर
- व्यसन व त्याचे दुष्परिणाम

राष्ट्रीय सेवा योजना, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-४११००८.
फोन. नं. ०२०२५६९७३४१, Web. www.unipune.ac.in/nss, mail : nss@unipune.ac.in